| MHOS080000682016 | **नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०१६**<br>**सुलाबाई ..वि.. व्यंकट व इतर** |
|---|---|

## <u>निशाणी क्रं. ५२ खाली आदेश पारीत</u>

प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द दिनांक १०/११/२०२५ रोजी उलट तपास नाहीचा आदेश रद्दबातल होऊन त्यांना वादी तर्फे साक्षीदाराचा उलट तपास घेण्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज केला आहे.

२. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, वादी यांचा उलटतपास घेणेकामी दिनांक १०/११/२०२५ रोजी तारीख नेमण्यात आली होती. सदर दिवशी उलटतपास नाही असा आदेश झाल्यामुळे वादी व वादीचे विधीज्ञ निघुन गेल्यामुळे तसेच प्रतिवादी क्र. १ हे आजारी असल्याने व इतर प्रतिवादी त्यांच्या सोबत असल्याने त्याच दिवशी सदरचा अर्ज देता आला नाही. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदर दाव्याप्रकरणी त्यांना उलटतपासाची संधी नाही मिळाल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा झालेला आदेश रद्दबातल होवुन, उलट तपासाची संधी देणे योग्य व न्यायाचे आहे, अशी विनंती केलेली आहे.

३. वादीने त्यांचे म्हणणे प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे दिलेले असुन अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, सदर प्रकरणामध्ये जाणुनबुजून उशीर केला आहे. शपथपत्र दाखल करुन दोन तीन तारखा झाल्या आहेत. अर्जातील कारण संयुक्तिक नाही. तरी सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व त्यावरील म्हणणे व संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. असे दिसुन येते की, वादी यांनी पुराव्याचे शपथपत्र

दिनांक २५/०९/२०२५ रोजी दाखल केलेले आहे. त्यानंतर दिनांक १०/११/२०२५ रोजी प्रतिवादी विरूध्द उलटतपास नाहीचा आदेश पारीत करण्यात झालेला आहे.

**५.** सदर प्रकरण हे आजरोजी वादीच्या पुराव्याकरीता आहे. प्रतिवादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये दिलेले कारण हे योग्य व संयुक्तीक नसुन, त्यांनी दिलेल्या करणासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतु सदर मुळ दाव्याचे स्वरुप पाहता, सदरचा दावा वाटणी होवुन पृथ्थक ताबा मिळण्याबाबतचा आहे. तसेच सदर प्रकरण स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याने आणि न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादीस उलट तपासाची संधी देणे योग्य व न्यायाचे वाटते. तसेच दोन्ही पक्षकारांची बाजु विचारात घेवुन न्यायनिवाडा करणेस मदत होईल. तसेच प्रतिवादी यांना उलट तपास घेण्यास बऱ्याच अवधीचा विलंब झालेला आहे. त्यामुळे वादी यांना त्रास व गैरसोय झालेली आहे. त्याबद्दल त्यांना नुकसान भरपाई पोटी दाव्यातील प्रतिवादींवर कॉस्टची रक्कम भरण्याच्या अटींवर त्यांना उलट तपासाची परवानगी देवुन, त्यांचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला.
२. प्रतिवादी यांना वादी तर्फे साक्षीदाराचा उलट तपासाची परवानगी रु. ३००/- खर्चाच्या रकक्मेवर देण्यात येते.
३. प्रतिवादी यांनी वरील नमुद खर्च वादीस लवकरात लवकर दयावा.

PRAVIN SHAMRAO BANKAR

Digitally signed by PRAVIN SHAMRAO BANKAR
Date: 2026.04.07 17:43:48 +0530

**दिनांक :-** ०७/०४/२०२६

**( पी.एस.बनकर )**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, लोहारा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | P.R.Barangule |
| Court Name | : | Shri. P.B.Bankar, CJJD Lohara. |
| Date | : | 07.04.2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 07.04.2026 |
| Judgment uploaded on | : | 07.04.2026 |